02-07-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 7/1/2025 10:49 PM Page 1



# एसजीपीडीए कचरा व्यवस्थापनावर नगरपरिषदेची नाराजी

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १ :** सोमवारी मडगावमधील एसजीपीडीए पार्किंग लॉट परिसरात दुर्गंधी पसरली, कारण पीडीएच्या मेगा रिटेल मार्केटमधून आलेला कचरा रस्त्यावर विखुरलेला होता. मडगाव नगरपरिषद आणि दक्षिण गोवा योजना आणि विकास प्राधिकरण यांच्यातील कचरा व्यवस्थापनातील विसंवाद पुन्हा एकदा स्पष्ट झाला.

भटक्या गुरांचा विखुरलेल्या कचऱ्यावर वावर,कचऱ्याची दुर्गंधी, आणि कोणतीही विल्हेवाट यंत्रणा नसल्याची स्पष्ट चिन्हे हे सर्व एका व्हायरल व्हिडिओमधून उघडकीस आले. त्यानंतर एमएमसीचे अभियंता दीपक देसाई यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

पीडीए मेगा रिटेल मार्केटमधून निर्माण होणारा कचरा गोळा करण्यास एमएमसीने कधीच नकार दिला नाही, परंतु तो आधी वर्गवारीनुसार वेगळा करून साठवणे ही पीडीए कंत्राटदारांची जबाबदारी आहे, असे दीपक देसाई यांनी स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले की, कचरा थेट पार्किंग लॉटवर टाकणे ही नियोजन संस्थेची गंभीर अक्षम्य चूक आहे. आपले कामगार कचरा उचलतात, पण त्यांना रस्त्यांवर कचरा विखुरलेला आढळतो, त्यामुळे कामात अडथळा निर्माण होतो, असे त्यांनी सांगितले.

यासाठी कचरा सेग्रिगेट' करणे अनिवार्य आहे . तसेच मार्केटमधील कचराकुंड्यांमध्येच कचरा साठवणे गरजेचे



असून एमएमसी कामगारांना वाहतुकीस सुलभ होण्यासाठी साफसफाई यंत्रणा मजबूत करण्याची गरज आहे

दीपक देसाई यांनी सुचवले की, पीडीएने एक आठवड्यासाठी बाजारात एक विशेष कामगार पथक नेमावे, जे बाजारातील कचरा वेगवेगळ्या वर्गवारीनुसार (ओला/सुक्या) वेगळा करेल आणि योग्य कचराकुंड्यांमध्ये ठेवेल. त्यानंतर एमएमसीचे कामगार तो कचरा सोन्सोडो डम्पिंग यार्डपर्यंत नेऊ शकतील.

या संपूर्ण गोंधळामुळे स्थानिक दुकानदार आणि नागरिकांनीही तीव्र संताप व्यक्त केला आहे. या दुर्गंधीमुळे ग्राहक येण्याचे प्रमाण कमी झाले आहे,असे एका विक्रेत्याने सांगितले. मडगाव शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या पीडीए मेगा मार्केटसारख्या महत्त्वाच्या वाणिज्यिक केंद्रात कचरा व्यवस्थापन ढासळल्यास, सार्वजनिक आरोग्य धोक्यात येते. एमएमसी आणि पीडीए यांच्यातील समन्वयाची कमतरता हा मुख्य मुद्दा असून, सुसंगत आणि जबाबदारी निश्चित असलेली यंत्रणा स्थापन करणे ही काळाची गरज आहे.

# विद्यार्थ्यांनी चिखलात उतरून अनुभवला पारंपरिक शेतीचा वारसा

■ टीम दैनिक हेराल्ड



**मडगाव, दि. १ :** कुडतरी गावात अलीकडेच पारंपरिक भात लागवडीचा अनोखा अनुभव विद्यार्थ्यांना देण्यात आला. आंगळी –टोले शेतात भर पावसात विद्यार्थ्यांनी त्यांच्या पालकांसह प्रत्यक्ष चिखलात उतरून भाताची लावणी केली आणि पर्यावरणीय शाश्वततेचे महत्त्व नव्याने जाणून घेतले.

या अनुभवात्मक शिक्षण सत्राचे आयोजन पर्यावरणवादी तल्लुला डि'सिल्वा आणि विशाल रावले यांनी केले होते. स्थानिक शेतकरी आणि कृषी–जैवविविधता प्रचारक जे. संतान रॉड्रिग्ज यांच्या सहकार्याने कार्यक्रम पार पडला. हा उपक्रम केवळ पारंपरिक शेतीचा अनुभव देणारा नव्हता, तर गोव्याच्या हरवत चाललेल्या कृषी वारशाला उजाळा देणारा ठरला.

ही संकल्पना विद्यार्थ्यांकडूनच पुढे आली होती. मी माझ्या शेतात लागवड पूर्ण केली होती, पण जेव्हा उत्सुकता पाहिली, तेव्हा दुसऱ्या शेतकऱ्याच्या मदतीने हा उपक्रम घडवून आणला, असे रॉड्रिग्ज सांगतात.

सुमारे ५० विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांनी यात सहभाग घेतला. हातात वावरे, कमरेपर्यंत चिखल आणि डोक्यावर पावसाची सर पण या साऱ्याला हरकत न ठेवता सगळ्यांनी पारंपरिक लावणीचा अनुभव घेतला. काहींच्या दृष्टीने हा एक लॉस्ट कनेक्शन पुन्हा जिवंत करणारा क्षण होता.

या गटाचा संबंध ट्रॅव्हलिंग डोम' उपक्रमाशी आहे, जो मुलांसाठी आणि कुटुंबांसाठी निसर्गाशी जोडणारे अनुभव घडवतो. कुडतरी मधील या भेटीत भातलागवडीनिशी वृक्षारोपण मोहीम देखील राबवण्यात आली. गोवा राज्य जैवविविधता मंडळाने रोपे पुरवली होती.

हे अनुभव फक्त शेती शिकवण्यासाठी नसतात, ते मूल्यांची आठवण करून देतात. मुलांनी आणि पालकांनी आपल्याच जमिनीबद्दल, अन्नाबद्दल नव्याने विचार करावा हेच आमचे उद्दिष्ट,असे डि'सिल्वा यांनी स्पष्ट केले.

रॉड्रिग्ज यांच्या मते, गोव्यातील यांत्रिकीकरणाकडे झुकणाऱ्या शेती धोरणांमध्ये अशा उपक्रमांचे महत्त्व अधिक आहे.सेंद्रिय आणि पारंपरिक पद्धती सर्वात फायदेशीर नसतील, पण शाश्वततेसाठी त्या अपरिहार्य आहेत, असे ते सांगतात.

कार्यक्रमाच्या व्यवस्थापनासाठी गोवा पीआरआयच्या कृषी–जैवविविधता पथकाने, गोवा राज्य जैवविविधता मंडळाच्या सहकार्याने मदत केली. सर्व सहभागींची काळजीपूर्वक नोंद घेतली गेली आणि आवश्यक साधने दिली गेली.

शेवटी, मनसोक्त चिखल खेळ, ओलसर सॉली, भाताचे बारीक रोपे, आणि पावसाच्या सरींनी हा दिवस केवळ एक शैक्षणिक सत्र न राहता एक समृद्ध अनुभव ठरला. ज्यातून गोव्याच्या ग्रामीण संस्कृतीबद्दल विद्यार्थ्यांना नव्याने आत्मीयता निर्माण झाली.माझ्या मुलाने प्रथमच शेतात काम केले. तो चिखलात रमला आणि आता शेतकऱ्यांविषयी आदर व्यक्त करतो, असे एका पालकाने सांगितले.

# ग्रामीण मित्र योजनेत १.४ लाखांहून अधिक विनंत्या पूर्ण

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १ :** गोवा सरकारने सुरु केलेली ग्रामीण मित्र योजनेद्वारे १.४ लाखांहून अधिक सेवा विनंत्या पूर्ण करण्यात आल्या आहेत. यामध्ये केवळ २०२४ मध्ये १.१५ लाख सेवा विनंत्यांची नोंद झाली, तर २०२५ च्या पहिल्या सहामाहीत २५,००० हून अधिक सेवा विनंत्या नोंदवल्या गेल्या असल्याचे सरकारने जाहीर केले आहे.

माहिती तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स आणि दळणवळण विभागया योजनेच्या अंमलबजावणीसाठी जबाबदार असून, त्यांनी नमूद केले की, ही योजना विशेषतः दुर्गम आणि ग्रामीण भागात मोठी गेम चेंजर ठरली आहे. सरकारी कार्यालयांमध्ये पुन्हा पुन्हा जाण्याची गरज उरलेली नाही.

निवास प्रमाणपत्र, जातीचा दाखला, ईडब्ल्यूएस दाखला, वृद्ध कलाकारांसाठी कला सन्मान' योजना, शिष्यवृत्ती अर्ज अशा विविध सेवा नागरिकांना त्यांच्या दारात मिळू लागल्याने, महिलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत आणि विद्यार्थ्यांपासून अपंगांपर्यंत सर्व थरांमध्ये ही योजना पोहोचत आहे.

माहिती तंत्रज्ञान विभागाच्या अधिकाऱ्याने स्पष्ट केले की, ग्रामीण मित्र डिजिटल अंतर भरून काढत आहेत आणि एक समावेशक सेवा वितरण मॉडेल घडवत आहेत. सरकारी सेवा डिजिटल आहेत पण अनेक नागरिकांना त्यांचा वापर अवघड वाटतो. ग्रामीण मित्र त्यांच्यासाठी पूल म्हणून काम करत आहेत

'ग्रामीण मित्र' हे गावागावातील प्रशिक्षित स्वयंसेवक आहेत, जे ई–गव्हर्नन्स पायाभूत यंत्रणेद्वारे नियुक्त केले जातात. प्रत्येक ग्रामीण मित्र' २०० पेक्षा अधिक सेवा लोकांपर्यंत पोहोचवू शकतो, आणि तो ८ ते ८ या वेळेत कार्यरत असलेल्या हेल्पलाइन क्रमांक १४४७१ द्वारे संपर्कात राहतो.

गेल्या वर्षभरात, गोव्याच्या सर्व पंचायत व नगरपालिका क्षेत्रात १९० हून अधिक ग्रामीण मित्र कार्यरत असून त्यांनी २००सेवा सामान्य जनतेपर्यंत पोहोचवल्या आहेत. यामुळे घरपोच प्रशासनाच्या दिशेने गोवा सरकारचा एक ठोस पाऊल उचलले गेले आहे, असे सरकारचे म्हणणे आहे.

ग्रामीण मित्र योजना' ही डिजिटल इंडिया आणि गव्हर्नन्सचे लोकाभिमुख रूप साकारण्याच्या केंद्र व राज्य सरकारच्या संकल्पनेचा भाग आहे. गोव्याच्या ग्रामीण भागात योजनेच्या प्रभावामुळे शासन आणि सामान्य माणसातील अंतर घटले असून, यामुळे शासन अधिक पारदर्शक आणि उत्तरदायी ठरते आहे.

# संगारेड्डी स्फोटातील मृतांचा आकडा ४२ वर

**हैदराबाद, दि. १ :**

तेलंगणातील संगारेड्डी जिल्ह्यातील पसामिलाराम औद्योगिक वसाहतीत सोमवारी सकाळी सिगाची केमिकल्स फॅक्टरीमध्ये झालेल्या भीषण स्फोटात किमान ४२ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून *४० हून अधिक जण जखमी झाले आहेत. या दुर्घटनेनंतर राज्यभरात हळहळ व्यक्त करण्यात येत असून, औद्योगिक सुरक्षेच्या नियमनांवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.



जिल्हा प्रशासनाच्या माहितीनुसार, रासायनिक अभिक्रियेदरम्यान रिऍक्टरमध्ये झालेला स्फोट इतका तीव्र होता की संपूर्ण औद्योगिक शेड उडून गेला. प्रत्यक्षदर्शी कामगारांच्या माहितीनुसार, काहीजण हवेत उडाले आणि थेट १०० मीटर अंतरावर खाली पडले. दुर्घटनेनंतर भयावह दृश्य निर्माण झाले होते. स्फोटानंतर लागलेली आग भडकत गेली, आणि संपूर्ण यंत्रणा आगीत वेढली गेली.

एनडीआरएफ, तेलंगणा अग्निशमन दल, हायड्रोका आणि स्थानिक आपत्ती व्यवस्थापन पथकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. आत्तापर्यंत काही मृतदेह बाहेर काढण्यात आले असून, २४ जण अद्याप बेपत्ता आहेत.५७ जणांना सुरक्षितपणे वाचवण्यात आले आहे, तर ३५ जण रुग्णालयात उपचार घेत आहेत. बचावकार्य अद्याप सुरू असून, परिसर सील करण्यात आला आहे.

अधिकृतरीत्या स्फोटाचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नसले तरी प्राथमिक अंदाजानुसार, रासायनिक मिश्रणातील चुकांमुळे रिऍक्टर ओव्हरहिट झाल्याचे बोलले जात आहे. कारखान्यात सुरक्षा यंत्रणा कितपत प्रभावी होत्या, याची चौकशी सुरू झाली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदीयांनी ट्विटर वर लिहिले, तेलंगणातील संगारेड्डी येथील कारखान्यात झालेल्या आगीच्या घटनेत झालेल्या मृत्युमुळे मी दु:खी आहे. ज्यांनी आपले प्रियजन गमावले आहेत त्यांच्यासोबत आमच्या संवेदना आहेत. जखमींना लवकर बरे व्हावे अशी मी प्रार्थना करतो.पीएमएनआरएफ मार्फत मृतांच्या कुटुंबीयांना २ लाख आणि जखमींना ५० हजार मदतीची घोषणा करण्यात आली आहे.

तेलंगणाचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनीही शोक व्यक्त केला. ही दुर्घटना हृदय पिळवटणारी आहे. सर्वांना लवकर बरे वाटावे आणि त्यांच्या कुटुंबीयांना बळ मिळावे, हीच प्रार्थना. बिहार सरकारनेही आपला भाग उचलत, बिहारमधील रहिवासी असलेल्या मृतांच्या आश्रितांना २ लाख आणि जखमींना ५० हजार मदतीची घोषणा केली आहे.

ही दुर्घटना औद्योगिक क्षेत्रातील सुरक्षा उपाययोजनांची भीषण पोकळी अधोरेखितकरते. वर्षभरात अनेक औद्योगिक दुर्घटनांचे साक्षीदार झालेल्या भारतात, सेफ्टी ऑडिट, तांत्रिक देखरेख आणि कर्मचारी प्रशिक्षण या बाबींमध्ये अजूनही मोठ्या प्रमाणावर दुर्लक्ष होत आहे.

रासायनिक कारखान्यांमध्ये सतत सुरक्षेच्या उपायांची तपासणी, ऑटोमेशन सिस्टीम्सची अंमलबजावणी आणि आपत्कालीन प्रतिसाद सक्षमता यासाठी राज्य आणि केंद्र सरकारला आता कठोर पावले उचलावी लागतील.

# वंचित बालकांचे संरक्षण: 'सीएसआर' निधीचा वापर होणार

## महिला आणि बाल विकास विभागाचे आवाहन | सामाजिक बदलासाठी निधीची गरज

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १ :** गोव्यातील रस्त्यांवर दिसणारी भीक मागणारी बालके केवळ सामाजिक व्यवस्थेतील उणीव दर्शवत नाहीत, तर त्यांची सुरक्षा, शिक्षण आणि मूलभूत हक्कांविषयीच्या अपयशाची दखलही मागतात. अशा पार्श्वभूमीवर, गोवा महिला आणि बाल विकास विभागाने एक महत्त्वाची आणि दूरदर्शी पावले उचलली आहेत.

विभागाने गोवा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ( जीसीसीआय ) आणि गोवा सीएसआर प्राधिकरणाला पत्र लिहून वंचित बालकांच्या संरक्षणासाठी विद्यमान राज्य संसाधनांमध्ये आर्थिक वाढ करण्यासाठी मदतीचे आवाहन केले आहे. ही विनंती कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी अंतर्गत करण्यात आली असून खासगी कंपन्या आणि व्यावसायिक संस्था यांचा निधी सामाजिक बदलासाठी प्रभावी ठरू शकतो, हे स्पष्ट करते.

राज्याने सीएसआर निधीचा वापर बाल संरक्षणासाठी प्रभावीपणे व्हावा यासाठी आता विशेष प्रयत्न सुरू केले आहेत, असे महिला व बाल विकास विभागाच्या संचालक ज्योती देसाई यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात नमूद केले आहे.



या प्रतिज्ञापत्राची पार्श्वभूमी ॲड. मोझेस पिंटो यांनी दाखल केलेल्या याचिकेसंदर्भात आहे, ज्यात गोव्यातील वाहतूक सिग्नल व सार्वजनिक ठिकाणी भीक मागणाऱ्या मुलांची स्थिती उचलून धरली आहे.

राज्य सरकारचा २४७ टोल–फ्री चाइल्ड हेल्पलाइन क्रमांक '१०९८', रस्त्यावर सापडलेल्या किंवा संकटात सापडलेल्या बालकांसाठी पहिला आधार बनला आहे. याशिवाय, मडगाव, म्हापसा आणि अन्य जिल्ह्यांमध्ये बाल संरक्षण कक्ष कार्यरत असून टास्क फोर्सद्वारे नियमित गस्त घालून मदतीची तत्काळ व्यवस्था केली जाते.

विभागाच्या माहितीनुसार, २०२४ पासून आतापर्यंत १९ बालकांना भीक मागण्याच्या सापळ्यातून बाहेर काढण्यात यश आले आहे. ही संख्या ऐकायला छोटी वाटू शकते, पण तिच्यामागे आहे एक संपूर्ण बचाव यंत्रणा, जी मुलांच्या भविष्यासाठी दिवसरात्र कार्यरत आहे.

सीएसआर म्हणजे फक्त निधी पुरवणे नव्हे, तर सामाजिक उत्तरदायित्व स्वीकारणे. राज्य सरकारच्या नवीन मोहिमेचा उद्देश व्यवसायिक संस्थांना केवळ योगदान देण्यास प्रवृत्त करणे नसून, त्यांच्या मनामध्ये सामाजिक बदलाची आंतरिक भावना निर्माण करणे हा आहे.या उपक्रमामुळे रस्त्यावरचा बालक पुन्हा एकदा शाळेच्या दिशेने वळू शकतो, असे एक सामाजिक कार्यकर्ते म्हणाले.

जुलै २०२५ पासून राज्यभर अंगणवाडी केंद्रे, पोलीस ठाणी, वाहतूक विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या समन्वयाने एक विशेष जनजागृती मोहीम राबवली जाणार आहे. या मोहिमेचा उद्देश भीक मागण्यास भाग पाडले जात असलेल्या मुलांविषयी जागरूकता निर्माण करणे, त्यांना औपचारिक शिक्षणात सामावून घेणे आणि मुलांच्या मूलभूत हक्कांविषयी समाजाला जागरूक करणेहा आहे.ही मोहीम केवळ शिक्षा व कायद्यांवर अवलंबून न राहता, सामाजिक भावना जागृत करून मुलांवरील अत्याचार, दुर्लक्ष आणि शोषण यांचा मूलभूत स्तरावर प्रतिबंध करेल, असा विश्वास आहे.

गोवा सरकारचा हा उपक्रम केवळ एक प्रशासकीय कृती नसून, सामाजिक बांधिलकीच्या नव्या पर्वाची सुरुवातआहे. जर व्यापारी संस्था आणि सामान्य नागरिक दोघांनीही त्यामध्ये सक्रिय सहभाग घेतला, तर ही पुढाकार केवळ एक योजना न राहता समाज परिवर्तनाचे साधन होऊ शकेल.

# लष्करी रुग्णालयाची जागा सार्वजनिक वापरासाठी मागितली

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १ :** गोवा सरकारने पणजीतील काम्पाल भागातील लष्करी रुग्णालयाची जागा सार्वजनिक हितासाठी परत मिळवण्याच्या प्रस्तावावर केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्याकडे पुनर्विचार करण्याची विनंती केली आहे.

राज्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी सोमवारी नवी दिल्लीमध्ये सिंह यांची भेट घेतली आणि गोव्याच्या संरक्षण व राष्ट्रीय सुरक्षाविषयक विविध प्रस्तावांची मांडणी केली. त्यामध्ये राज्यात एक सैनिक शाळा मंजूर करण्याची विनंती, तसेच पणजीतील लष्करी आणि दंत रुग्णालयाचे स्थलांतर करून सद्य जागेचा जनहितासाठी उपयोग करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला.

सध्याच्या जागेचा सार्वजनिक वापर सुलभ करण्यासाठी लष्करी रुग्णालयाचे स्थलांतर आवश्यक आहे, असे मुख्यमंत्री कार्यालयाकडून जारी करण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे.

पणजीतील कला अकादमीसमोरील काम्पाल परिसरात असलेल्या या लष्करी रुग्णालयाचे एकूण क्षेत्रफळ सुमारे ५२०० चौरस मीटर आहे. ही जागा शहरी सार्वजनिक उपयोजनासाठी – सांस्कृतिक केंद्र, सार्वजनिक उद्यान, नागरिक सुविधा केंद्र यासाठी उपयुक्त ठरू शकते, अशी राज्य सरकारची भूमिका आहे.

या भेटीत मुख्यमंत्री सावंत यांनी राज्यात 'सैनिक शाळा' स्थापनेची गरज अधोरेखित केली. गोव्यातील विद्यार्थ्यांमध्ये संरक्षण सेवांबाबत रस वाढवण्यासाठी आणि राष्ट्रीय सेवा भावनेला चालना देण्यासाठी अशी शाळा उपयुक्त ठरेल, असे ते म्हणाले.

या भेटीनंतर, मुख्यमंत्री सावंत यांनी केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पियुष गोयल यांचीही भेट घेतली. या भेटीत गोव्याच्या कृषी व स्थानिक उत्पादनांच्या निर्यातीसाठी समर्थन भक्कम करण्याच्या धोरणांवर चर्चा झाली. गोव्यात अपेडा (कृषी व प्रक्रिया केलेले अन्न उत्पादन निर्यात विकास प्राधिकरण) चे कार्यालय स्थापन करण्याबाबतही विनंती करण्यात आली आहे, जेणेकरून गोव्याचे मत्स्य, फळ, फुलं आणि इतर सेंद्रिय उत्पादने देशाबाहेर निर्यात करण्यास चालना मिळेल.